पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-८
सभावृत्तांत

दि.- २/१/२०१३ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये दि.२/१/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग अध्यक्षा
२) मा.आल्हाट मंदा उत्तम
३) मा.काळजे नितीन प्रताप
४) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५) मा.सुपे आशा रविंद्र
६) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
७) मा.अजित दामोदर गव्हाणे
८) मा.गोफणे अनुराधादेविदास
९) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१०) मा.गव्हाणे सुरेखा शंकर
११) मा.महेशदादा किसन लांडगे
१२) मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१३) मा.लोंढे शुभांगी संतोष
१४) मा.विश्वनाथ विठोबा लांडे
१५) मा.भोसले राहूल हनुमंत
१६) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१७) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१८) मा.गायकवाड संध्या सुरदास
१९) मा. मोटे किरण बाळासाहेब
२०) मा. संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्री. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, श्री.रविंद्र जाधव-प्र.प्रशासन अधिकारी, श्री. कुदळे-कार्यकारी अभियंता विदयुत, श्री.बरशेट्टी- कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा क प्रभाग, श्री.इनामदार-लेखाधिकारी, श्रीम.पाठक-उपअभियंता जलनिस्सारण, श्री.जगताप-उपअभियंता स्थापत्य, श्री.सोनवणे-उपअभियंता (स्थापत्य), श्री.पाटिल- उपअभियंता (झोनिपु), श्री.घुबे-उपअभियंता, श्री.राणे-उपअभियंता, स्थापत्य, श्री.पाटील- उपअभियंता (विदयुत), श्री.काळे-उपअभियंता (पापु), श्री.बोजे- उपअभियंता (स्थापत्य/उदयान), श्री.रविंद्र शिंदे-उपअभियंता (पापु), श्री.दाते- प्र.सहा.आरोग्याधिकारी, श्री.जावळे- उपअभियंता (ड-पापु), श्री.राशे एन.एस- उद्यान सहाय्यक.

सर्वप्रथम मा.अध्यक्षा यांनी सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात केली.

मा.अध्यक्षा- देशातील दिल्ली येथील युवतीवर (सामुहीक बलात्कार) झालेल्या अत्याचाराने निधन झाल्याने, तसेच अभिनेते शरद पेंडसे व आनंद अभ्यंकर यांचे अपघाती निधन झाल्याने त्याना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनीटे सतब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)
विषय क्रमांक १) दि. ५/१२/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

तदनंतर खालीलप्रमाणे मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-२) प्रभाग क्र. ६२ मध्ये फुगेवाडी/गणेशनगर/ओंकारवस्तीजवळ फायबरचे टॉयलेट बसवणेबाबत- मा.संध्या गायकवाड व मा.मंदा आल्हाट यांचे पत्र.
विषय क्रमांक-३) प्रभाग क्र. ६२ फुगेवाडी बसस्टॉप मुंबई पुणे रस्ता येथे फायबरचे टॉयलेट बसवणेबाबत-मा.संध्या गायकवाड व मा.मंदा आल्हाट यांचे पत्र.
विषय क्रमांक-४) वार्ड क्र. ३४ गव्हाणे वस्ती, येथील विकास कामे करणेबाबत-मा.सुरेखा गव्हाणे व मा.शुभांगी लोंढे यांचे पत्र.
विषय क्रमांक-५) प्रभाग क्र. ३६ मध्ये नव्याने बांधलेल्या जलकुंभास नाव देणेबाबत- मा.शुभांगी लोंढे व मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.
विषय क्रमांक-६) क-प्रभागामधील रस्ते व गटारे साफसफाई कर्मचारी संख्या वाढविणेबाबत- मा.सौ.सुनिता उर्फ (माई) पांडुरंग गवळी, मा.अजित गव्हाणे व मा.संजय काटे यांचे पत्र.
विषय क्रमांक-७) अभय योजना मुदतवाढ दि. ३१/३/२०१३ पर्यंत करणेबाबत.- मा.सौ.सुनिता उर्फ (माई) पांडुरंग गवळी, मा.अजित गव्हाणे व मा.वसंत लोंढे यांचे पत्र.

------

ठराव क्रमांक-१३१ विषय क्रमांक- २
दिनांक- २/१/२०१३ विभाग- स्थापत्य क
सुचक-मा.संध्या गायकवाड अनुमोदक-मा.मंदा आल्हाट

मा.संध्या गायकवाड व मा.मंदा आल्हाट यांचे पत्र.

वार्ड क्र. ६२ फुगेवाडी, गणेश नगर, ओंकार वस्ती जवळ, दापोडी पुणे-१२ येथे पुरुषांसाठी फायबरचे टॉयलेट बसवणे दापोडी येथील विनीयार्ड चर्च येथून येणारे-जाणारे भक्तगण रस्त्याच्या कडेला घाण करत असल्याने तेथील रहिवाशांना त्या दुर्गंधीला सामोरे जावे लागते त्यामुळे तेथे त्वरीत फायबरचे टॉयलेट बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १३२ विषय क्रमांक-३
दिनांक- २/१/२०१३ विभाग-स्थापत्य क
सुचक-मा.संध्या गायकवाड अनुमोदक-मा.मंदा आल्हाट

मा.संध्या गायकवाड व मा.मंदा आल्हाट यांचे पत्र.

वॉर्ड क्र.६२ फुगेवाडी, बसस्टॉप, मुंबई पुणे रोड येथे पुरुषांसाठी फायबरचे टॉयलेट बसवणे. पुरुषांची गैरसोय होत असल्याने तसेच बसस्टॉपचे लोक इकडे तीकडे घाण करीत असल्याने त्यांची दुर्गंधी तेथील रहिवाशांना होत आहे म्हणून त्वरीत फायबरचे टॉयलेट बसवणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १३३ विषय क्रमांक-४
दिनांक- २/१/२०१३ विभाग- स्थापत्य क
सुचक-मा.सुरेखा गव्हाणे अनुमोदक-मा.शुभांगी लोंढे
संदर्भ- मा.सुरेखा गव्हाणे व मा.शुभांगी लोंढे यांचे पत्र

प्रभाग क्र. ३४ मधील खालील ठिकाणची विकास कामे करणेस मान्यता देणेत येत आहे. १) गव्हाणे वस्ती, समता मित्र मंडळ येथील सार्वजनिक स्वच्छतागृह दुरुस्त करणेस २) गव्हाणे वस्ती येथील गट्टू (ब्लॉक) बसविणेस व दुरुस्त करणेस ३) गव्हाणे वस्ती येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेस ४) ड्रेनेज लाईन व चेंबर दुरुस्त करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १३४ विषय क्रमांक- ५
दिनांक- २/१/२०१३ विभाग- पाणीपुरवठा
सुचक-मा.शुभांगी लोंढे अनुमोदक-मा.अनुराधा गोफणे
संदर्भ- मा.शुभांगी लोंढे व मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.

प्रभाग क्र. ३६ मध्ये २० दशलक्ष जलकुंभ (पाण्याची टाकी) नव्याने तयार झाली आहे त्या जलकुंभास कै.ज्ञानेश्वर सिताराम लोंढे हे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १३५ विषय क्रमांक- ६
दिनांक- २/१/२०१३ विभाग- आरोग्य (मुख्यालय)
सुचक-मा.अजित गव्हाणे अनुमोदक-मा.संजय काटे

संदर्भ- मा.सुनिता (माई) पांडुरंग गवळी, मा.अजित गव्हाणे व मा.संजय काटे यांचे पत्र.

सध्या प्रभागातील रस्ते व गटारे इ. साफसफाई ही शासनाचे धोरणानुसार २५० कुटूंब संख्येच्या प्रमाणानुसार कर्मचारी नेमणूक करणेत येते परंतु दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या त्याप्रमाणात वाढणारे कचरा व्यवस्थापन होणे आवश्यक आहे. तसेच काही प्रभाग दाट कुटूंब संख्येचे असुन काही प्रभाग विरळ कुटूंब संख्येचे व भौगोलीकदृष्टया मोठे आहेत त्यामुळे वरील शासन निर्णयानुसार कर्मचारी संख्या अपुरी आहे. तरी भौगोलीक ( प्रभाग रचना / स्वरुप) कुटूंब संख्या इ. बाबी विचारात घेऊन प्रभाग निहाय (क प्रभाग) आरोग्य कर्मचारी ( पदनिहाय) वाढ करणे संबंधीचे मुख्य कार्यालय आरोग्य विभागाने धोरण निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १३६ विषय क्रमांक- ७
दिनांक- २/१/२०१३ विभाग- पाणीपुरवठा (मुख्यालय)
सुचक-मा.अजित गव्हाणे अनुमोदक-मा.वसंत लोंढे

संदर्भ- मा. मा.सुनिता (माई) पांडुरंग गवळी, मा.अजित गव्हाणे व मा.वसंत लोंढे यांचे पत्र.

मा.आयुक्त यांनी जाहीर केलेली थकीत पाणी बील व तक्रारी संबंधीची जाहीर केलेली अभय योजना २०१२ मुदत दि. ३१/१२/२०१२ रोजी संपलेली आहे. परंतु नागरीकांचे सोयीसाठी व योजना प्रसार विचारात घेता सदर योजनेची मुदत ही दि. ३१/३/२०१२ पर्यंत वाढविणेत यावी व आलेल्या अभय योजनेतील तक्रार अर्जदार यांना सुधारीत बिले त्वरीत देणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(मा.सुनिता (माई) पांडुरंग गवळी)
अध्यक्षा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कप्रस/कावि/ २०८ /२०१३
दि. ३१/१/२०१३

प्र. प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.